


# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २७३ वा ❑ शनिवार दि.२७ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## मराठी माणूस एकत्र येईल काय?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

शेवटी उद्धव व राज ठाकरे एकत्र आलेच.१९ वर्षांनी उद्धव आणि राज दोन्ही भाऊ मराठीच्याअस्मितेसाठी एकत्र आले १९ वर्षानंतर दोन्ही बंधू एकत्र आले मात्र मराठी माणूस एकत्र येईल काय?. हा प्रश्न परत एकदा निर्माण झाला आहे. हे बघणे औत्सुक्याचे ठरणार!

बाळासाहेब जिवंत असे पर्यंत हे दोन बंधू एकत्र होते. बाळासाहेबांच्या मृत्यूनंतर या दोन बंधूंची राजकीय वाटचाल वेगळी झाली. शिवसेनेतून राज ठाकरे वेगळे पडले.त्यांनी महाराष्ट्र नव निर्माण सेनेची स्थापना केली.

मार्च २००६ रोजी राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केली. त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या प्रमाणात उलथापालथ झाली.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची (मनसे) राजकीय वाटचाल राज ठाकरे यांनी शिवसेनेतून वेगळी वाट घेऊन २००६ मध्ये सुरू केली, ज्याचा पाया मराठी माणूस, महाराष्ट्र आणि मराठी भाषेच्या विकासावर आधारित आहे; सुरुवातीला उत्तर भारतीयांविरुद्ध आक्रमक भूमिका आणि मनसेच्या स्थापनेनंतर २००९ मध्ये १३ जागा जिंकून मोठी झेप घेतली, पण नंतर त्यांची भूमिका बदलून हिंदुत्व आणि महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित झाले, ज्यामुळे सुरुवातीच्या मराठी माणूस केंद्रित राजकारणातून आता कणखर पर्याय म्हणून पक्ष पुढे आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे, असे त्यांच्या युतीवरून वाटते. मनसेच्या स्थापनेपासून राज ठाकरे महाराष्ट्राचे राजकारणात फारसा करिष्मा दाखवू शकले नाही. आणि याचा नेमका फायदा इतर राजकीय पक्षांनी घेतला.

बाळासाहेबांच्या मृत्यूनंतर उद्धव ठाकरे यांनी शिवसेना सांभाळली महाराष्ट्राच्या राजकारणात भाजपसोबत युती करून सत्तेत आले मात्र नंतर जागा वाटपावरून शिवसेना आणि आणि भाजपमध्ये ठिणगी पडली ती कायमचीच त्यानंतर उद्धव ठाकरे काँग्रेस व राष्ट्रवादी कडे वळले. पुढे शिवसेनेत फूट पडून शिंदेंनी वेगळा गट तयार केला शिंदे गट भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस जाऊन मिळाला.. अशाप्रकारे महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेनेची शकले पडली. बाळासाहेबांच्या काळात शिवसेनेची जी प्रतिष्ठा ,जी छाप, जो दरारा होता नाहीसा झाला.

गेले अनेक महिने राज आणि उद्धव ठाकरेंची युती कधी होणार याची राजकीय वर्तुळात चर्चा होती. या चर्चेला अखेर आज पूर्णविराम मिळाला. आमची युती ही कुठल्या जागेसाठी नाही तर ती मराठी माणसाचे अस्तित्व मिटवण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तीला गाडून टाकण्यासाठी आहे असं राज ठाकरे म्हणाले. सुरुवातीपासून राज ठाकरे यांची भूमिका महाराष्ट्र मुंबई आणि मराठीची अस्मिता यावर केंद्रित होती ती देखील आज कायम आहे परंतु राज ठाकरे यांचे विचार उद्धव ठाकरेंना कळले किंवा नाही कळून ते अनभिज्ञ राहिले... आज उद्धव ठाकरे महाराष्ट्राच्या हिता बद्दल बोलत आहे. उद्धव ठाकरेंना तेव्हा महाराष्ट्राचे हित कळले नव्हते का? एकत्र आलो आहोत, एकत्र राहण्यासाठी ही उद्धव ठाकरेंची घोषणा आज सत्यात उतरली. पण हेच आधी समजून घेतले असते तर...?महाराष्ट्राचे राजकारण काही वेगळेच राहिले असते.

बाळासाहेबांच्या मृत्यूनंतर हे दोन्ही बंधू एकत्र आले असते तर आज महाराष्ट्राच्या राजकारणाचे चित्र काही वेगळेच राहिले असते परंतु सत्तेच्या मोहा पायी हे दोन्ही बंधू विस्कटले गेले परिणामतः मराठीची व शिवसेनेची वाताहात झाली. मनसेचे अस्तित्व असून देखील नसल्याचे झाले. महाराष्ट्राच्या राजकारणात भाजपाचा जो झंजावात सुरू झाला त्या झंजावाता पुढे मनसे उद्धव ठाकरे यांची शिवसेना लुप्त होण्याच्या मार्गावर झाली या पार्श्वभूमीवर परत एकदा मराठीचा मुद्दा घेऊन हे दोन्ही बंधू एकत्र आले आहेत. मराठीची अस्मिता मराठी भाषा हाच अजेंडा घेऊन परत एकदा महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी व मुंबईसाठी एकत्र आलेले आहेत. दोन्ही बंधू एकत्र आले ही आनंदाची गोष्ट आहे यांची युती अशीच काय राहिली पाहिजे. मनसे आणि शिवसेनेच्या युतीची घोषणा दणक्यात झाली. मुंबई, ठाण्यासह महाराष्ट्रातील मराठी माणसाची अनेक वर्षांची इच्छा पूर्ण झाली. आता ठाकरे बंधू एकत्र आल्यानंतर मुंबई, महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी मिळेल. पण, ठाकरे बंधूंच्या एकीकरणाचा भाजपला फटका बसणार का? मराठी माणसाची एकजूट करण्यात ठाकरे बंधू यशस्वी ठरणार का? मराठी भाषिक एकत्र येतील काय?

या युतीमुळे महाराष्ट्रात ठाकरे बंधूंच्या नव्या राजकीय पर्वला सुरुवात झाल्याचे मानले जाते. या युतीमुळे राज्यातील राजकीय समीकरणे कोणत्या प्रकारे बदलणार? त्यात त्यांचा इतर राजकीय पक्षावर परिणाम होणार का?दोन्ही बंधूंच्या एकत्र येण्याने मराठी माणूस एकत्र येईल काय? महाराष्ट्राच्या राजकारणाचे चित्र पलटेल काय,? मुंबईत परत एकदा मराठीचा मराठीच्या अस्मितेचा नारा चालणार काय?

. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याने मराठी माणूस एकवटेल, असे अनेक तज्ज्ञांकडून सांगण्यात येतेय. पण दोन्ही भावांमुळे मतांचे ध्रुवीकरण किती थांबणार? हेही तितकेच महत्त्वाचे आहे. राज आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्याने मराठी मतदारांची विभागणी थांबेल काय ? शिवसेना आणि मनसे ची मतसंख्या वाढेल काय?हे बघणे औत्सुक्याचे ठरेल.

# ‘प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारा’ने देशातील वीस मुलांचा सन्मान; छत्रपती संभाजीनगरच्या अर्णव महर्षीचा समावेश

**ज्योतिर्मय साहित्य**

**नवी दिल्ली** - वीर बालदिनाचे औचित्य साधून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज देशातील २० मुलांना प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने(२०२५) सन्मानित करण्यात आले.

विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कामगिरीसाठी छत्रपती संभाजी नगर येथील अर्णव महर्षीला गौरविण्यात आले. महिला व बालविकास मंत्रालयातर्फे राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सात क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी देशभरातील २० बालकांना २०२५ या वर्षासाठीचे प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान केले.

शौर्य, विज्ञान-तंत्रज्ञान, कला-संस्कृती, समाजसेवा, क्रीडा आणि पर्यावरण अशा क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल या बालकांना गौरविण्यात आले. यापैकी दोघांना मरणोत्तर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्कारार्थींमध्ये मध्ये ९ मुले आणि ११ मुलींचा समावेश आहे. यावेळी केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी, राज्यमंत्री सावित्री ठाकूर आणि मंत्रालयाचे सचिव अनिल मलिक उपस्थित होते.

**महाराष्ट्राच्या अर्णव महर्षीचा गौरव**

महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथील १७ वर्षीय अर्णव महर्षी यास विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. लकवाग्रस्त रुग्णांच्या हातांसाठी -आधारित पुनर्वास उपकरण आणि ॲक्टिव्ह हँड रिस्ट बँड तयार करणाऱ्या अर्णव महर्षी याने स्मार्टफोन किंवा लॅपटॉपच्या मदतीने हे नवोन्मेषी उपकरण विकसित केले आहे. या पुरस्काराचे स्वरूप पदक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे आहे.

‘राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करून ही बालके भारताच्या अमृत पिढीचे खरे प्रतिनिधी आहेत. शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि इतर आव्हानांवर मात करून शौर्य, कला-संस्कृती, पर्यावरण, नवाचार, विज्ञान, समाजसेवा व क्रीडा अशा विविध क्षेत्रांत त्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. हा पुरस्कार युवा पिढीतील शौर्य, धैर्य आणि संवेदनशीलतेला प्रोत्साहन देणारा ठरेल, असे त्यांनी सांगितले.




या मुलांच्या संकल्प आणि प्रयत्नांमुळे २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार होईल असा विश्वास राष्ट्रपती यांनी यावेळी व्यक्त केला.

# आणि सूर्य खड्ड्यात पडला..

**ज्योतिर्मय साहित्य**

एका पावसाळी दुपारी मी आणि कृष्णा फिरायला निघालो होतो कृष्णाला इंद्रधनुष्य बघायचं होतं. चालता चालता आम्ही बरंच अंतर पार केलं होतं. नुकताच पाऊस थांबला होता, गार हवा अंगाशी झोंबत होती. आल्हाददायक वातावरण होतं. आकाश मोकळं झालं होतं. सूर्यकिरणं ढगांआडून डोकावत होती.

इंद्रधनुष्य बघायला मिळेल, असं काही वाटेना; पण तो काही विषय सोडत नव्हता. इंद्रधनुष्याविषयी सगळ्या गप्पा मारुन झाल्या. त्या मागची भौगोलिक कारणं सांगून झाली ; पण ते दिसत मात्र नव्हतं. मग त्याचं लक्ष इतरत्र वळवण्यासाठी मी त्याला रस्त्यावर इंधन पडलेल्या ठिकाणचे रंग दाखवू लागले. थोडंफार इंद्रधनुष्यासारखं दिसत होतं. थोडावेळ इंद्रधनुष्यावरुन लक्ष हटवण्यात मी यशस्वी झाले होते पण अगदी थोडावेळच.

पुन्हा त्याची गाडी इंद्रधनुष्यावर आलीच. कृष्णासारखी मुलं एकदा एका गोष्टीचा ध्यास घेतला की मनाचं समाधान झाल्याशिवाय त्या गोष्टीचा पाठपुरावा करणं सोडत नाहीत. अखेर रस्त्यावरचा काठोकाठ भरलेला एक खड्डा माझ्या मदतीला धावून आला. त्या खड्ड्यातील पाण्यात सूर्याचे प्रतिबिंब उमटले होते . मी ही गोष्ट कृष्णाच्या निदर्शनास कशी आणावी याचा विचार करत त्या सूर्याच्या प्रतिबिंबाकडे बघत होते. नेमकी त्याच वेळी कृष्णाची नजर त्या खड्ड्याकडे



गेली आणि टाळ्या वाजवत उड्या मारत तो म्हणाला,''आई सूर्य खड्ड्यात पडलाय बघ''. आम्ही त्या खड्ड्याकडे आणि खड्ड्यातल्या पाण्यातल्या सूर्याच्या प्रतिबिंबाकडे पाहत राहिलो. कृष्णाला खूप मजा वाटत होती तेवढ्यात ते प्रतिबिंब हलू लागलं. सुरुवातीला आनंदाने उड्या तो मारू लागला आणि हळूहळू त्या आनंदाची जागा प्रश्नांनी आणि शंकांनी घेतली ‘आई सूर्य पाण्यात कसा पडला ?, मग तो पाण्यात पडला तेव्हा त्याला लागलं का? सूर्याला लागतं म्हणजे काय होतं? रक्त येतं का ? तो रडतो का?.. त्याच्या प्रश्नांची मालिका अखंड सुरूच राहिली. सुरुवातीला मला हसू येत होतं; पण नंतर लक्षात आलं जे प्रश्न कृष्णा मला विचारतोय त्यातल्या एकाही प्रश्नाचे समाधानकारक उत्तर माझ्याकडे नाही




मग त्याला मी म्हटलं की ‘सूर्य खड्ड्यात पडला नाही पण ते पाणी आपल्याला सूर्याचे रूप दाखवते म्हणजे आपण आरशासमोर उभे राहिलो की आरसा कसा आपल्याला आपलं रूप दाखवतोय तसं हे खड्ड्यातलं पाणी सूर्याचं रूप आपल्याला दाखवतेय’ मग कृष्णाचा पुढचा प्रश्न की सूर्य आणि पाण्याची ओळख आहे का? आता मात्र मी खरंच निरुत्तर झाले. त्यावेळी मी त्याला स्पष्ट सांगितलं की,’तू जे प्रश्न मला विचारतो आहेस त्याची उत्तर मला माहिती नाहीयेत आपण घरी जाऊया आणि मग शोधू या’

जरी कृष्णाला त्याच्या प्रश्नाचं उत्तर मिळालं नसलं तरी आपण विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर आईला देता येत नाहीये, याचा एक वेगळाच आनंद त्याच्या चेहऱ्यावर आणि कृतीतून हालचालीतून मला दिसला.

मुळात तो इंद्रधनुष्याचा विषय सोडायला तयार नव्हता.

म्हणजे माझ्याकडून त्याच्या काही अपेक्षा होत्या की आपण आई सोबत फिरायला गेलो की आपल्याला इंद्रधनुष्य बघायला मिळेल किंवा आई ते दाखवेल, ही अपेक्षा त्याच्या मनामध्ये होती. ही आपली अपेक्षा पूर्ण होणार या कल्पनेने तो

आनंदून गेला होता ; पण ती अपेक्षा पूर्ण झाली नाही म्हणून तो निराशही व्हायला लागला होता. तेवढ्यात त्याला पर्यायी गोष्टी दिसल्या आणि मग त्याचं मन इंद्रधनुष्याचा नाद सोडून प्रतिबिंबाकडे आकर्षित झालं त्यामुळे कदाचित त्याचं समाधानही झालं होतं. इंद्रधनुष्य ही गोष्ट त्याच्यासाठी केवळ एक दृश्य नव्हती, तर ती एक कल्पना होती त्याच्यासाठी आणि त्या गोष्टीबद्दल त्याला आश्चर्यही वाटत होतं.

त्याच्या मनातली इंद्रधनुष्याची जागा आता रस्त्यावर सांडलेल्या इंधनातून निर्माण झालेले रंग आणि पाण्यातल्या प्रतिबिंबानं घेतली होती.

प्रतिबिंब आणि खरं अस्तित्व यातला फरक समजून घेण्याचं त्याचं वयच नव्हतं. त्यामुळे तो प्रत्यक्ष वस्तू आणि कल्पना यांच्यात सहज संबंध जोडत होता.

‘‘आई, सूर्य खड्ड्यात पडला!’’, ‘‘त्याला लागलं का?’’ , ‘‘रक्त येतं का?’’ या त्याच्या प्रश्नांतून हे कळतं की, तो सूर्याला जिवंत प्राणी मानतो. त्याच्यासाठी सूर्याला वेदना होऊ शकतात, तो रडू शकतो.

जेव्हा प्रतिबिंब हलू लागलं तेव्हा त्याच्या मनात आनंद, भीती, नवल, गोंधळ, प्रश्न, शंका असे संमिश्र भाव होते.

जेव्हा मी म्हटलं, मला तुझ्या प्रश्नांची उत्तरं माहिती नाहीयेत. तो क्षण अत्यंत महत्त्वाचा वाटला मला. मुलांच्या मनात आई ‘सर्वज्ञ’ असते, अशी प्रतिमा असते. ती प्रतिमा थोडीशी ढासळली; पण ती नकारात्मक नव्हती.. उलट, त्याला स्वतःच्या प्रश्नांच्या ताकदीचा आनंद त्याला मिळाला. म्हणजे ‘‘मी इतका मोठा प्रश्न विचारला की आईलाही उत्तर देता आलं नाही!’’ असं त्याला वाटलं असेल आणि अजून प्रश्न विचारण्याची परवानगी किंवा स्वातंत्र्य मला आहे, ही भावना त्याच्या मनामध्ये रुजली असावी. मूल जेव्हा प्रश्न विचारतं, तेव्हा प्रत्येक वेळी त्याला उत्तरच हवं असतं असं काही नसतं किमान त्या घटनेचा अर्थ त्याच्या मनाला पटेल अशा पद्धतीने सांगितला जावा, अशी त्याची अपेक्षा असते. त्यावेळी जर मी म्हटलं असतं की काहीतरी उडवाउडवीची उत्तरं देऊयात आणि त्याच्या या प्रश्नांच्या मालिकेपासून स्वतःची सुटका करून घेऊयात, तर कदाचित त्या घटनेबद्दलची त्याची जिज्ञासा तिथेच मरून गेली असती आणि त्याला पुन्हा कधी प्रश्न विचारावेसे वाटलेच नसते. मला वाटतं आणखी एक गोष्ट घडली की मला उत्तर माहिती नाही मग आपण सोडून देऊयात किंवा हा विषय तू डोक्यातून काढून टाक असं न म्हणता आपण घरी जाऊन या प्रश्नाचे उत्तर शोधूयात असं मी म्हटल्यामुळे आपण प्रश्न विचारणं अगदी योग्य आणि सुरक्षित आहे अशी खात्री त्याला वाटली असेल उत्तर मिळणं महत्त्वाचं नाही पण त्या उत्तराचा शोध घेणे ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे ही गोष्ट त्याच्या मनावर कदाचित त्याच वेळी बिंबली असेल. मुलांच्या आत्मविश्वासासाठी अशा गोष्टी अत्यंत पोषक असतात असं आज मी ठामपणे म्हणू शकते पालकांनी मुलांच्या प्रश्नांकडे केवळ उत्तर द्यायच्या दृष्टीने न पाहता त्यामागील जिज्ञासा, भावना आणि विचारप्रक्रिया ओळखण्याचा प्रयत्न करावा. प्रत्येक प्रश्नाला तात्काळ उत्तर देणं आवश्यक नसतं; कधी कधी ‘‘आपण एकत्र शोधूया’’ असं म्हणणं मुलासाठी अधिक प्रेरणादायी ठरतं. अशा संवादातून मुलांमध्ये आत्मविश्वास, विचारस्वातंत्र्य आणि शिकण्याची नैसर्गिक ओढ निर्माण होते. हीच पालक म्हणून दिली जाणारी खरी शैक्षणिक साथ आहे.

आणि म्हणूनच ती पावसाळी दुपार आम्हा दोघांसाठीही एक नवा विचार जन्माला घालणारी आणि खूप काही शिकवणारी ठरली.

A UNIQUE FRAME...



@sanjaydaramwar +91 98694 20337




# जात्यावरच्या ओव्या......

मावशीच्या गावा
जाते आगनगाडी
नवल सांगते माय
सोयर्याला खेडोपाडी ||४१७||

जाया मावशीच्या गावा
दिस लागले दोन
इतक्या दुर बाबा
तिला दिल काढून? ||४१८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मानवतेचा आणि सेवेचा प्रकाश : डॉ. प्रकाश आमटे




ज्योतिर्मय साहित्य

परवाच्या दिवशी व्हाट्सअपवर नवीन चित्रपटासंदर्भात एक पोस्ट फिरत होती. सालार, डंकी आणि आणखी असेच काही बॉलिवूडचे मसाला चित्रपट येत असताना प्रेक्षकांनी अस्सल हिरोकडे पाठ फिरवली. हा अस्सल हिरो म्हणजे सॅम बहादूर. सॅम माणेकशॉ हे भारताचे पहिले फिल्ड मार्शल. भारतीय लष्करात चाळीस वर्षे सेवा बजावून आपल्या देशातील जवानांना आणि तरुणांना सेवेचा आदर्श त्यांनी उभा केला. तरुणाईने पाहिलाच पाहिजे असा हा चित्रपट पण हा चित्रपट मी पाहायला गेलो तेव्हा थिएटरमध्ये तुरळक गर्दी होती. पाहणारे बहुसंख्य प्रेक्षक साठी ओलांडलेले होते. असाच एक रिअल हिरो म्हणजे प्रकाश बाबा आमटे. आपल्या वडिलांचा म्हणजेच थोर समाजसेवक बाबा आमटे यांच्या सेवेचा आणि त्यागाचा वारसा पुढे चालवणाऱ्या त्यांच्या विकास आणि प्रकाश या दोन सुपुत्रातील द्वितीय. हा द्वितीय पुत्र तसा एकमेवाद्वितीयच म्हणावा लागेल. बाबा आमटे कुष्ठरोग्यांसाठी कार्य सुरु करतात. एक दिवस आपल्या मुलांसह भामरागडच्या जंगलात सहलीसाठी म्हणून जातात. भामरागडचे जंगल हे जाण्यासाठी अत्यंत गैरसोयीचे. रस्ते नीट नाहीत, दळणवळण सुविधा नाहीत. आरोग्याच्या सोयी तर नाहीतच पण जंगलातील माडिया, गोंड यासारखे आदिवासी तर आरोग्य आणि शिक्षण यांच्याबद्दल काडीचीही आस्था नसलेले. अशा वेळी बाबांना प्रश्न पडतो. मी तर आनंदवनात कुष्ठरोग्यांसाठी कार्य सुरु केलंय पण




अशा बिकट ठिकाणी माझ्या आदिवासी बांधवाना कोण सेवा देणार ? त्यांच्या मनातील खंत जाणून घेऊन नुकताच डॉक्टर झालेला प्रकाश म्हणतो, मी करीन इथे काम. बाबांच्या चेहऱ्यावर आनंद झळकतो.

एम बी बी एस झालेला, डोळ्यात भविष्याची स्वप्ने तरळत असलेला हा तरुण निश्चय करतो आदिवासींच्या सेवेचा. त्याच्यासाठी हे काम अजिबात सोपं नसतं. गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुका आणि त्या तालुक्यातील हेमलकसा हे ठिकाण. इथे सुरु होतो लोकबिरादरी प्रकल्प. या क्षेत्रात माडिया, गोंड आदी आदिवासी जमातींचा निवास. त्यांची भाषा वेगळी. राहणी तर कमालीची साधी. अंगावर पुरेसे वस्त्रही नाही. शिकार करून मिळेल ते खायचे. नाही मिळाले तर उपाशी राहायचे. कुपोषित बालके जन्माला येणं ही तर जणू काही इथली परंपराच ! त्यातील काही योगायोगाने जगायचे आणि पुढे अनेक आजारांचे शिकार व्हायचे. बाळंतपणत होणारे मृत्यूही भरपूर. त्यांना कोणी काही सांगू गेले किंवा शिकवू गेले तर, त्या माणसाला ते आपला शत्रू समजायचे अशी सगळी परिस्थिती. **(क्रमशः)**



ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# चतुर्दश ब्रम्हाचा गणेशवंदन

ज्योतिर्मय साहित्य


देहबुध्दीच्या अहंकाराने देहाभिमान वाटू लागला. अज्ञान रूपातील झोप लागल्याने अजूनचं अज्ञानी रहातात. अज्ञानी लोक अशा रितीने झोपेतचं मरतात. आणि पून्हा जन्माला आल्या बरोबर झोपी जातात. असे अगणित जीव आतापर्यंत आले आणि गेले जन्ममरणाची येरझार संपता संपत नाही. यासाठी तरी भगवंताची ओळख होणे गरजेचे आहे. ''जन्मे न कोणी मरेन कोणी हे जाणावया लागूनी परमार्थाचा ऊपाय जाणी शास्त्र कारे कथन केला.''अज्ञानाच्या झोपेत खूप जीवांनी जन्ममरणाच्या स्वैर ये जा केली. हे कष्ट होऊ नयेत म्हणून आत्मज्ञान करून घेतले पाहिजे. आत्मज्ञान समजण्यासाठी आपले अध्यात्मिक ग्रंथ वाचावेत त्याच्या शिकवणूकीवर चालावे. तसे सात्विक सद्गवर्तन असावे.

आत्मज्ञान करून देणारी अध्यात्मविद्या ती मीच होय. प्रकांड वादविवाद तो मीचं होय. आता पुढचा विचार लक्ष पूर्वक एका.

अध्यात्मविद्येमध्ये प्रतिपादन केलेला परमार्थ सांगणारा अद्वेत ग्रंथ समजून घेण्यास सोपा नसतो. आपल्या सर्वागाचे कान करणारा श्रोताच तो ग्रंथ समजण्यास समर्थ किंवा पात्र होतो. विषय प्रतिपादन करताना,ऐकताना ज्याचे मन अत्यंत एकाग्र होऊ शकते त्यालाच परमार्थातील अद्वेत ग्रंथ कळू शकतात.

श्रीराम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ

# लीन माणसाला भगवंत लवकर साधेल



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नामस्मरण करायचे ते अभिमान टाकून करीत जावे. परमेश्वराला अनन्यशरण जाऊनच त्याचे नाम घेत जावे. पुष्कळ वेळा, आपण साधन करू लागलो म्हणजे आपल्याला अभिमान चढू लागतो, आणि त्यामुळे साधन व्यर्थ होते. संताकडे जाताना आपण मनामध्ये काही एक बरोबर घेऊन जाऊ नये; किंवा काही नेलेच तर भगवंताचे प्रेम न्यावे. आपण प्रपंचाचे प्रेम आणि अभिमान बरोबर घेऊन जातो आणि मग, एकावर एक लिहिलेले जसे वाचता येत नाही तशी अवस्था होते. एखादी वस्तू आपल्याला हवी असे वाटल्यावर आपण तिच्या प्राप्तीविषयी विचार करू लागतो. म्हणूनच पहिल्याने, भगवंत हवा असे आपल्याला वाटले पाहिजे. त्यानंतर त्याच्या प्राप्तीच्या साधनांचा अभ्यास करायला पाहिजे. हा अभ्यास मनाच्या कष्टाचा आहे. क्रोधाला बाहेर येऊ देण्यापेक्षा, क्रोध गिळणे यात जास्त श्रम आहेत. असे करण्यामध्ये आज कष्ट आहेत हे खरे, पण पुढे मात्र सुख आहे हे निश्चित. वागण्यात, बोलण्यात आणि चालण्यात आपण सावधगिरी बाळगावी; नको ते टाळावे.

अनन्यतेला पैसा लागत नाही. विद्या लागत नाही; त्याला फक्त आपली अभिमानवृत्ती बाजूला ठेवावी लागते. भगवंताचे होण्यासाठी अंगी लीनता आलीच पाहिजे. लीन माणसाला भगवंत लवकर साधेल. लीनतेमध्ये बाकीचा विसर पडून भगवंत तेवढा शिल्लक राहतो. जो वृत्तीने लहान आहे त्याला भगवंत लवकर वश होतो. मनुष्य मोठा असून लहानासारखा वागला तर ते फार चांगले असते. मनाने मात्र आपण बळकट बनले पाहिजे. आपण स्वत:शी चोवीस तास उघडा व्यवहार करावा. भगवंताने आपल्याला केव्हाही जरी पाहिले तरी आपल्याला लाज वाटता कामा नये. आपले वागणे असे असावे की भगवंताची आस मनामध्ये वाढत जाऊन, तिचे पर्यवसान ध्यासामध्ये व्हावे. रात्री जे स्वप्न पडावेसे वाटते ते दिवसभर करावे. यासाठी आपली वृत्ती नामामध्ये गुंतवून ठेवावी. 'असावे सर्वांत पण नसावे कोणाचे' अशा वृत्तीने जो राहील त्याला लवकर परमार्थ साधेल.

देहाच्या उपचारांना जो भुलतो तो भगवंताला अगदी विसरलेला असतो. पण ज्याचे अनुसंधान मजबूत असते त्याला जगातल्या ऐश्वर्याची किंमत नसते. पैशाची वासना आणि लौकिकाची लालसा माणसाला भगवंतापासून दूर नेतात. त्यांच्या तावडीत सापडता कामा नये. लोकेषणा आणि धनेच्छा या दोन्ही गोष्टींचा संबंध प्रपंचात वावरत असताना येणारच. तो टाळता येणे कठीण आहे. पण ज्याला भगवंताचे प्रेम पाहिजे आहे त्याने त्यांचा गुणधर्म ओळखून त्यांना वापरावे, म्हणजे त्यांच्यापासून उत्पन्न होणारे दोष त्याला बाधणार नाहीत.

अभिमानरहित जावे रामाला शरण ।
त्यानेच राम आपला होईल जाण ।।

***




# भगवान श्रीकृष्णाची लीला स्थाने

संकलन : मधुकर बोरीकर

## संत श्री नरसिंह मेहता

ज्योतिर्मय साहित्य



आता नरसी मेहता वऱ्हाड घेऊन कसे जाणार ?असे त्या टिंगल खोऱ्याला वाटले. मदन मोहन यांच्या गावी वऱ्हाड जाणार होते. आणि गरीब नरसी मेहताचे परिवार यावेळेस तरी उघडा पडेल, त्याची फाटलेली वस्त्रे हे लोकांना हसण्यास भरपूर वाव मिळेल, असे समजून टिंगलखोर वाट पाहत होता.

नरसिंह मेहतांनी लग्नाचे निश्चिती झाली ,तिथी ठरली की सर्वप्रथम निमंत्रण भगवान श्रीकृष्णाला दिले. आणि खूप तळमळीने आणि अर्जवाने प्रभूस विनंती केली की. त्यांनी या लग्नात सम्मिलित व्हावे. प्रभू तुम्ही थोर, या गरीबाच्या घरच्या लग्नाला तुम्ही आलेच पाहिजे. मी तुमचे बाळ आहे. माझ्या घरच्या लग्नाला तुम्ही न येऊन कसे चालेल ?अशी आग्रहाची वारंवार विनंती केली. आणि तो लग्नाच्या तयारीला लागला. मदन मोहन यांच्या गावाकडे वऱ्हाड रवाना झाले. टिंगलखोर आता हे वऱ्हाड करी कसे दिसतात? आणि आपल्याला कशी मजा पाहायला मिळते,यांना कसे हिणवता येते, अशी वाट पाहून होता. वऱ्हाड त्या गावी गेले ज्या लग्नात प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण समिलीत झाले ते वऱ्हाड कसे असेल? टिंगल खोराची पाहून तर वाचाच बंद पडली. सर्वच वराडकरीच्या अंगावर भरजरी वस्त्रे, मोठमोठे सोन्याचे अलंकार, आणि सर्वत्र थाट दिसून येत होता. भगवान श्रीकृष्ण ज्या वऱ्हाडात संमिलीत आहेत तिथे दारिद्र्य कोठून दिसणार? भगवंताने ज्याला आपला मानले, त्याला भगवंत दारिद्र्यात कसे ठेवतील?

याचप्रमाणे त्यांच्या कुंवर बाईचा मायरा हाही प्रसंग असाच आहे. कुंवर बाई ही त्यांची कन्या, लग्न होऊन सासरी गेली. आणि ती गरोदर असताना, सातव्या महिन्यात तिला चोळी घालायची आणि तिच्या सासरच्या माणसांना आहेर करून (याला मायरा म्हणतात )मुलीला प्रसुतीसाठी माहेरी घेऊन यायचे, असा प्रकार होता. ज्यावेळेस नरसी मेहता तिथे पोहोचले त्यांच्याजवळ काहीही नव्हते. ती मुलगी ही वडीलाकडे आता कसे होणार ?म्हणून प्रश्न विचारती झाली. बाबा या सासरच्या माणसांना आता तुम्ही काय देणार? त्यावर नरसी मेहता फक्त एवढेच म्हणाले, आहेत भगवंत पाहतील काय करायचे ते.

दुसरे दिवशी गाडीभर सामान आले. त्यात वस्त्र प्रावरणे डाग दागिने इत्यादी भरलेले होते. नरसी मेहतांनी सुरुवातीला जाताना मातीचे दोन भांडी फक्त तिला दिले होती. त्या भांड्यावर मातीचेच झाकण ठेवलेले होते. सासरचे लोक सुरुवातीला मातीचेच भांडे दिले म्हणून हसत होते, पण ज्यावेळेस ही गाडीभर सामान आलं ते पाहिलं आणि त्याच वेळेस ते झाकण काढलं तेव्हा त्या मातीचे भांड्यात संपूर्णपणे सोन्याची नाणी भरलेली होती. हा प्रसंगही प्रभू कसा क्षणोक्षणी, भक्ताला सांभाळतो, त्याच्या अडचणीची सोडवणूक करतो, हे या प्रसंगातून आपणास कळते.

भगवंतावर प्रगाढ प्रेम कसे असावे? कोणतीही याचना न करता ,प्रेम रस कसा विशुद्ध असू शकतो, हे नरसी मेहता यांच्या चरित्रातून आपणास कळते.

या महान संताला कोटी कोटी प्रणाम करून हा भाग इथे थांबूयात. स्त्रोत :- इंटरनेट




# तुमचा मूड अचानक चढ-उतार होतोय? कदाचित व्हिटॅमिन डी कमी आहे!

ज्योतिर्मय साहित्य

चिडचिड वाढलेली वाटते

एकटं, उदास वाटणं

खरंतर काही त्रास नाही, पण ''बरे वाटत नाही''

तर एकदा व्हिटॅमिन डी टेस्ट करून पाहा

शरीर सांगत असतं, पण आपण ऐकत नाही!

मग उपाय काय?

सकाळी २०-३० मिनिटं उन्हात बसा

शक्यतो ८:३० च्या आधीचा सूर्यप्रकाश मिळवा.

डॉक्टरांच्या सल्ल्याने व्हिटॅमिन डी सप्लिमेंट घ्या

टेस्ट केल्याशिवाय अंदाजाने घेऊ नका.

फॅटयुक्त नैसर्गिक अन्न खा:

जसे लोणी, तूप, दूध, बदाम, बिया (फ्लॅक्स, सनफ्लॉवर)

मन शांत ठेवण्यासाठी ध्यान / ब्रेथिंग एक्सरसाईस करा

जे मूड सुधारायला मदत करतं.

''मन, शरीर, आणि सूर्य या तिघांचं एक खास नातं आहे''

मनाला मोकळं ठेवायचं असेल, तर शरीरात सगळ्या नुट्रीऐंट्स असाव्या लागतात.

व्हिटॅमिन डी हा त्यातला एक महत्त्वाचा सोल्जर आहे.

म्हातारपण लवकर नको?

तारुण्य टिकवण्यासाठी हे उपाय नक्की करा!

तरुणांनाच काय, वयोवृद्धांनाही चिरतरुण राहायचं असतं. पण त्यासाठी काही गोष्टी नियमित केल्या तर वाढतं वय थांबवता येतं.

खाली दिलेले उपाय आयुष्यात अमृतासारखे ठरू शकतात.

शरीराला शुद्ध ऑक्सिजन मिळू द्या!

-दीर्घ श्वसन करा, प्राणायाम करा

-फुफ्फुसं मजबूत राहतील, पेशींना नवी ऊर्जा मिळेल

-म्हातारपण दूर राहील

''प्रत्येक पेशीला ऑक्सिजन दिला, की शरीर झाडासारखं टवटवीत राहतं!''

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

दिवसात ३ वेळा अंघोळ करा अंगाला, आत्म्याला आणि मनाला.

-अंघोळीने केवळ शरीरच नाही, तर मनही प्रसन्न राहतं

-ऊर्जेचा नवा झरा उघडतो

-प्रदूषण, धूळ, वाईट स्पर्श सगळं धुवून निघतं

''अंघोळीमुळे फक्त शरीर नाही, मनही उजळतं!''

योग्य वेळी आहार घ्या आणि तेल-तूप वापरा

-भरपेट खा पण वेळेवर

-केसात, डोळ्यात, कानात तेल वापरा

-तेल लावून सूर्यनमस्कार करा बघा कसं शरीर झळाळतं

''जेवणात वेळ, आहारात तूप आणि जीवनात शिस्त हीच तरुणपणाची गुरुकिल्ली आहे!''

दररोज १५ मिनिटं स्वतःशी जोडा ध्यानधारणा करा

-''सृष्टी माझ्यासाठी आहे'' हा विचार

-मनात सकारात्मकता, चेहऱ्यावर तेज

''ज्याचं मन शांत, त्याचं शरीरही दीर्घकाळ शांत राहतं!''

झोप म्हणजे रिचार्ज ती घ्या प्रेमाने!

-रात्रीची झोप = सकाळचा उत्साह

-झोपेमुळे शरीर भरून निघतं

-मानसिक आरोग्यही टिकतं

''जेव्हा तुम्ही झोपता, तेव्हा तुमचं शरीर काम करतं त्याला ती संधी द्या!''

***



# लघु बोधकथा

♦वेळेचे महत्त्व♦

एक स्वार आपल्या घोड्याला खरारा करून त्याच्यावर खोगीर घालत असता घोड्याच्या एका पायाच्या नालाचा एक खिळा सुटून पडला आहे असे त्याला दिसले. पण तेथे दुसरा खिळा बसविण्याचे काम त्याने मागे टाकले. काही वेळाने लढाईवर जाण्याचे इशारे देण्याचे शिंग वाजू लागताच तो स्वार आपल्या घोड्यावर बसून लढाईच्या जागेकडे निघाला. त्या फौजेच्या सेनापतीने हुकूम सोडला की, 'सर्वांनी आपले घोडे भरधाव सोडून शत्रूंवर तुटून पडावे व त्यांचा पाठलाग करावा.' हुकमाप्रमाणे तो स्वार आपला घोडा उडवीत चालला असता खिळा पडल्यामुळे सैल झालेला घोड्याचा नाल गळून पडला व त्यामुळे घोडा लंगडत लंगडत चालू लागला. लंगडताना एका दगडावर त्याचा पाय आपटल्यामुळे स्वार घोड्यावरून खाली पडला व तो शत्रूच्या हाती सापडताच शत्रूने लगेचच त्याला मारले.

तात्पर्य :
जेव्हाचं काम तेव्हा न करता ते आळसाने पुढे ढकलणे ही सवय वाईट व घातक आहे.

# सकारात्मक विचारांनीच यशाचा मार्ग मोकळा होतो - डॉ. अनुपम टाकळकर

## वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी ''आय एम ए साथी'' उपक्रमाची सुरुवात

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखेच्या वतीने ''आयएमए साथी'' या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अधिष्ठाता डॉ शिवाजी सुक्रे, उपअधिष्ठाता डॉ. प्रभा खरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर होते. यावेळी डॉ. पी. एम. दरक, डॉ. दत्तात्रय कदम, डॉ. अझीझ कादरी हे मान्यवर पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयएमए छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर होते. आयएमएचे सचिव डॉ. योगेश लक्कास, समन्वयक डॉ. अर्चना कल्याणकर, डॉ. गायत्री तडवळकर, डॉ. विनोद मुंदडा, विभागप्रमुख डॉ प्रसाद देशपांडे यांची उपस्थिती लाभली.

या उपक्रमांतर्गत वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी मानसिक आधार प्रणाली मजबूत करण्यासाठी एक विशेष मदत फलक अनावरण करण्यात आला. या फलकावर शहरातील दहा मानसोपचार तज्ज्ञांची नावे व संपर्क क्रमांक देण्यात आले असून हे फलक वसतिगृहे, ग्रंथालय आणि विद्यार्थ्यांच्या नियमित वापरातील ठिकाणी लावण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना मानसिक तणाव, चिंता किंवा अस्वस्थता वाटल्यास थेट तज्ज्ञांशी संपर्क साधता येणार आहे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. अनुपम टाकळकर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, प्रत्येकाने आपल्या आयुष्यात स्पष्ट ध्येय निश्चित केले पाहिजे. ध्येयाशिवायचे आयुष्य निरर्थक ठरते. त्यांनी उपस्थितांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करत आत्मविश्वास, आशावाद आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टीकोन ठेवण्याचे आवाहन केले. मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष न करता वेळेवर मदत घेणे ही जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. योगेश लक्कास यांनी ''आयएमए साथी'' या संकल्पनेचा सविस्तर अर्थ सांगितला. हा उपक्रम केवळ कार्यक्रम नसून वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी कायमस्वरूपी आधार व्यवस्था असल्याचे त्यांनी नमूद केले. आयएमए विद्यार्थ्यांच्या सोबत आहे, हा विश्वास निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे




त्यांनी सांगितले.

डॉ.पी.एम. दरक यांनी आपल्या भाषणात वैद्यकीय विद्यार्थ्यांमध्ये एकत्रितपणा आणि परस्पर काळजी यांचे महत्त्व अधोरेखित केले. एकमेकांच्या अडचणी समजून घेणे, सहकार्य करणे आणि गरज असताना आधार देणे ही मूल्ये जपली पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

उपअधिष्ठाता डॉ. प्रभा खरे यांनी दैनंदिन जीवनातील ताणतणाव व्यवस्थापनाचे महत्त्व स्पष्ट केले. कामाचा ताण, अभ्यासाचा दबाव आणि वैयक्तिक अडचणी यांचा समतोल राखण्यासाठी योग्य मानसिक सवयी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तणावाकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

मानसोपचार तज्ज्ञ डॉ. प्रसाद देशपांडे यांनी संवाद कौशल्यांचे महत्त्व विशद केले. योग्य संवादामुळे अनेक मानसिक समस्या कमी करता येतात, असे त्यांनी सांगितले. स्वतःच्या भावना व्यक्त करण्याची सवय विद्यार्थ्यांनी लावावी, असा सल्ला त्यांनी दिला.

डॉ. अमोल देशमुख यांनी दैनंदिन तणावाचा सामना कसा करावा यावर मार्गदर्शन केले. नियमित दिनचर्या, पुरेशी झोप, शारीरिक हालचाल आणि वेळेवर समुपदेशन यामुळे मानसिक संतुलन राखता येते, असे त्यांनी सांगितले.

डॉ. अझीझ कादरी यांनी दैनंदिन जीवनात आध्यात्मिक आणि धार्मिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. श्रद्धा, प्रार्थना आणि आत्मचिंतन यामुळे मनाला स्थैर्य मिळते, असे त्यांनी नमूद केले.

आयएमए साथी हा उपक्रम वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी एक महत्त्वपूर्ण आणि काळाची गरज ओळखून उचललेले पाऊल असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. हा उपक्रम भविष्यात इतर वैद्यकीय महाविद्यालयांसाठीही मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

**''आय एम ए साथी'' म्हणजे काय?** आयएमएसाथी हा इंडियन मेडिकल असोसिएशन छत्रपती संभाजीनगर शाखेने सुरू केलेला देशातील पहिला वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी सुरू केलेला विशेष आधार उपक्रम आहे. या उपक्रमाचा उद्देश वैद्यकीय शिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना येणारा ताण, मानसिक दबाव, एकटेपणा आणि भावनिक अडचणी यावर वेळेवर आणि योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हा आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांना थेट मानसोपचार तज्ज्ञांशी संपर्क साधता येईल, नियमित मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येईल आणि कॅम्पसमध्ये सहज उपलब्ध अशी मदत व्यवस्था उभारण्यात येणार आहे. आयएमए साथी हा विद्यार्थ्यांसाठी विश्वास, आधार आणि सुरक्षिततेचा संदेश देणारा उपक्रम आहे.




## पिठापुरम

**ज्योतिर्मय साहित्य**



या मंदिरात प्रवेश केल्याबरोबर भारल्या सारखे होते. इथे दिव्यत्वाची जाणीव क्षणाक्षणाला होते व त्या दिव्य पादुकांचे दर्शन घेऊन कृतकृत्य झाल्यासारखे वाटते. या मंदिरात सकाळी रुद्राभिषेक आपणास करता येतो. पुजारी वर्ग आपला गोत्र व नावाचा उच्चार करून आपणा तर्फे संकल्प सोडवतात. नंतर ते सविस्तर पादुकांचा रुद्राभिषेक करतात.अनेक भक्त मंदिरात बसून गुरुचरित्र या दिव्य ग्रंथाचे पारायण करतात.मंदिराचे प्रांगणात औदुंबराचे झाड आहे.औदुंबर हा पवित्र वृक्ष आहे. त्याच्या तळाशी दत्तप्रभूंचा नित्य वांस असतो.मंदिरातील हा वृक्ष तर साक्षात श्रीपाद श्रीवल्लभ यांचे सानिध्य लाभलेला आहे.भक्त आपल्या कौटुंबिक अडचणी,व्यथा या औदुंबरास सांगतात व नवस बोलून साकडे घालतात.नवस फेडण्यासाठी लोक या वृक्षास नारळाची माळ अर्पण करतात व प्रदक्षिणा घालतात. संध्याकाळी सात वाजता श्रीपादांच्या दिव्य पादुका आणि मूर्ती यांची पालखी मिरवणूक असते. दोन पालख्यात स्थापित केलेल्या या दिव्य पादुका व मूर्ती यांची पालखी, भक्तांद्वारे मंदिराभोवती फिरवली जाते. या काळात रूद्राचे पठण व भजन या दिव्य घोषात पालख्या तीन वेळेस मंदिराभोवती फिरवल्या जातात. एकूण २४ लोकांना या पालखीची सेवा करता येते

पालखी सेवा करताना त्याची तिकीट विक्री सकाळी ११ वाजता सुरू होते व लगेचच २४ लोक झाले की बंद होते.

आजही श्रीपाद श्रीवल्लभ हे दिव्य ज्योती स्वरूपात तिथे विद्यमान आहेत. व ते निस्सीम भक्तांना दर्शन देतात व त्यांचा अध्यात्मिक उत्कर्ष करतात असा अनेकांचा अनुभव आहे.

कुंती माधव मंदिर- येथे इंद्र द्वारा निर्मित भारतातील पाच माधव मंदिरांपैकी एक कुंती माधव मंदिर आहे. हे भगवान श्रीकृष्णां ना समर्पित मंदिर आहे.

अण्णावरम येथील श्री सत्यनारायण मंदिर पिठापुरम पासून २५ किलोमीटर अंतरावर अन्नावरम या गावी श्री सत्य नारायणाचे एक भव्य मंदिर आहे. या मंदिराचेही दर्शन आवर्जून करावे असेच आहे.

अशा रीतीने पिठापुरम जगदंबेचे शक्ती स्थळ, भगवान शिवाचे क्रिया स्थळ तर श्रीपाद श्रीवल्लभांचे ज्ञानस्थळ अशी त्री स्थळी एकत्र असणारे पुण्य पावन क्षेत्र आहे.अशा पुण्य क्षेत्री पितृऋण,ग्रह दोष हरण व श्रीपाद श्रीवल्लभ यांची असीम कृपा प्राप्त करून घेण्यासाठी आपण या पावन भुमीस भेट द्यायलाच हवी.या दिव्य स्थानास मनोमन वंदन करून इथेच विराम देवू यात.

दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा

# वारकरी संप्रदाय : स्वरुप आणि साहित्य स्मृतिग्रंथाला विदर्भ साहित्य संघाचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

## समीक्षक प्रा.बाळकृष्ण कवठेकर, डॉ.सतीश बडवे यांच्या लेखनाचा सन्मान

**ज्योतिर्मय साहित्य**

**जालना –** मराठी साहित्यातील ज्येष्ठ समीक्षक प्रा. बाळकृष्ण कवठेकर, संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सतीश बडवे संपादित स्व.हभप रंगनाथरावतात्या चोरघडे स्मृति ''वारकरी संप्रदाय : स्वरुप आणि साहित्य'' या जालन्यातील सुयश प्रकाशनच्या संदर्भ ग्रंथाला विदर्भ साहित्य संघाचा राज्यस्तरीय डॉ.मा.गो. देशमुख स्मृति

पुरस्कार जाहीर झाला आहे, अशी माहिती प्रकाशिका आरती सुहास सदाव्रते यांनी दिली आहे..


वारकरी संप्रदाय : स्वरुप आणि साहित्य या स्मृतिग्रंथात

वारकरी संप्रदाय तत्त्वज्ञान : जयंत देशपांडे यांचा विस्तृत लेख आहे. काश्मीरी शैव व वारकरी संप्रदाय या विषयावर मधुकर रामदास जोशी यांनी मांडणी केलेली आहे.

श्रीमद् भागवत आणि वारकरी संप्रदाय या विषयावर डॉ. विद्यासागर पाटंगणकर यांचा अभ्यासपूर्ण लेख आहे. साधन ते सार पंढरीची वारी : सचिन परब तसेच

संतांच्या क्षेत्रांच्या वाऱ्या : दत्तात्रय प्रभाकर डुंबरे यांच्या लेखातून परंपरेची वाटचाल कशी याचे चित्रण आहे.

महाराष्ट्रातील कीर्तनपद्धती आणि भजनपरंपरा




: राधाकृष्ण अकोलकर यांनी सविस्तर व सखोल मांडणी केली आहे.

लिंगायत व वारकरी चळवळीचे साहित्य या विषयावर ज्येष्ठ साहित्यिक प्रा.बसवराज कोरे यांचा लेख आहे.

केशवस्वामी भागानगरकरांचा वारकरी संप्रदायाशी अनुबंध : काशी गायकवाड-तिखे

संत कवयित्रींचा आत्मस्वर : वैशाली कुलकर्णी,

संत तुकारामांच्या अभंगातील उत्तर भारतीय संत यावर ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांचा लेख लक्षवेधी ठरतो.

वारकरी संतांच्या निवडक रचनाप्रकारांची वैशिष्ट्ये : न. ब. कदम, वारकरी संतांचा पर्यावरणविषयक व कृषीविषयक दृष्टिकोन - ज्ञानेश्वर गाडे, यांचेही ग्रंथात लेख आहेत.

संत एकनाथ यांच्या हिंदी पदरचना या अनुषंगाने संपादक डॉ.सतीश बडवे यांचे चिंतनातून भक्तीभावनेला प्राधान्य देणाऱ्या आणि समाजसन्मुख विचारांचा पुरस्कार करणाऱ्या नाथ महाराज यांच्या रचना असल्याचे डॉ.बडवे यांनी अधोरेखित केले आहे. संत नामदेवांच्या रचनेतील सामाजिक आशय : मिरजकर श्यामसुंदर तसेच संत एकनाथ आणि संत तुकाराम यांचा अनुबंध ताहेर एच. पठाण यांनी मांडला आहे.


संत मुक्ताबाईचे ताटीचे अभंग यावर प्रमोद कुमावत यांनी विस्तृतपणे विषयाचे महत्व विशद केले आहे.

संत सावता माळी : ऋषिबाबा गुलाबराव शिंदे, संत गुलाबराव महाराज : सुनील वायाळ यांचेही लेख आहेत. स्मृतिग्रंथात लक्ष वेधून घेणारा आणि वडील मुलांच्या भावनिक नातेबंधाचे अनुभव शब्दबद्ध करणारा मैत्र : बाप-लेकांचं हा कैलास इंगळे यांनी लिहिलेला लेख वाचकाला अंतर्मुख व्हायला भाग पाडतो.

घरात वारीची परंपरा असताना मुलांवर जीवनमूल्य संस्काराची झालेली रुजवण कशी आणि यातून आपण कसे घडत गेलो असा लेकाने बापाच्या व्यक्तीमत्वाचा घेतलेला जीवनानुभववेध वाचताना डोळ्याच्या कडा पाणावल्या शिवाय राहत नाही, असे शब्दचित्र माझे तात्या या लेखात मुंजाजी रंगनाथराव चोरघडे यांनी हळूवारपणे टिपले आहे, हे विशेष.

> आमच्या घरात वारीची मोठी परंपरा आहे. हभप तात्यांनी आयुष्यभर वारकरी जीवनमूल्य जोपासली. याच विचारांचा वारसा जतन व्हावा म्हणून हा ग्रंथ प्रपंच जाणीवपूर्वक केला आहे.
>
> **–आशा मुंजाजी चोरघडे,**
> सरपंच, धारखेड

> स्व.हभप रंगनाथरावतात्या यांच्या आठवणी या ग्रंथ रुपाने चिरकाल टिकून राहाव्या यासाठीचा प्रयत्न आहे. या ग्रंथाला विदर्भ साहित्य संघाचा मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला याचाही अधिक आनंद आहेच..
>
> **–आरती सुहास सदाव्रते**
> प्रकाशक, सुयश प्रकाशन, जालना





# विद्यार्थ्यांनी चित्रातून रेखाटले वास्तव...

**ज्योतिर्मय साहित्य**

सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आतापर्यंत अनेक स्तुत्य उपक्रम राबवून आदर्शवत अशी कामगिरी बजावलेली आहे मग ते ऐतिहासिक विषयावरील महानाट्य असो किंवा संपूर्ण वंदे मातरम सारखी देश प्रेम जागणारी आगळी स्पर्धा असो की प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम असो पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपक्रमांचे अनुकरण होते. यातच सर्व आले. असे उपक्रम हे सहज जाता जाता होत नाहीत त्यामागे शिक्षक विद्यार्थी आणि पालकांचेही योगदान असते परस्पर सहकार्यानेच हे उपक्रम यशस्वी होतात अर्थातच अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करणाऱ्या निष्ठावान शिक्षकांचा यात महत्त्वाचा वाटा असतो त्यांनी अशा उपक्रमात रस घेऊन मुलांना प्रोत्साहित करावे लागते मुलांच्या सुप्तगुणांना आकार देणारे शिक्षक त्यांच्याकडून आगळे काहीतरी करून घेऊ शकतात.






असेच सुंदर उपक्रम सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालय कामठी येथे विद्यार्थ्यांनी आखून आपल्या शिरपेचात एक मोरपिस चढविले आहे. निमित्त होते.स्नेह संमेलनाचे.दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील हिरक जयंती महोत्सवाच्या निमित्ताने स्नेह संमेलन आयोजित करण्यात आले.तीन दिवस चाललेल्या या ऐतिहासिक उपक्रमा कनिष्ठ महाविद्यालयातील वि विद्यार्थ्यांसाठी पोस्टर, रांगोळी व मेहंदी स्पर्धा आयोजित करण्यात आली.रांगोळी व पोस्टर मधून विद्यार्थ्यांनी बेटी बचाव, बेटी पढाव, पर्यावरण सुरक्षा, नवीन शैक्षणिक धोरण, प्रदूषण, भृण हत्या ऑपरेशन सिंदूर, वाढते रस्ते अपघात महापुरुषांचे फोटो ज्यात डॉ बाबासाहेब आंबेडकर,कवी सुरेश भट यांचे फोटो. अशा प्रकारची चित्रे रेखाटली. काही विद्यार्थ्यांनी तर इतक्या सफाईने आणि प्रभावीपणे चित्रे काढली की ती विद्यार्थ्यांनी काढली की यावर विश्वास बसणार नाही. दुर्गेश आप्तुरकर या विद्यार्थ्याने डॉ बाबासाहेब आंबेडकर व कवी सुरेश भट यांचे तैलचित्र हुबेहूब काढूले.पाहणारे प्रेक्षक थक्क राहून गेले.

स्नेह संमेलना दरम्यान रंगारंग कार्यक्रम जसे की संगीत, भावगीत आयोजित करण्यात आले. विद्यार्थिनींनी भावगीत गाऊन प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.संजीवनी खुरपडी व प्रियांशी कडू या विद्यार्थिनींनी हीच आमची प्रार्थना अन हेच आमचे मागणे एक राधा एक मीरा गायले.सर्व भावविश्वात रमून गेले.या गाण्यातून मंत्रमुग्ध केले म्हणजे गाण्याने सर्वांना इतके भुरळ पाडली की ते त्या गाण्यात पूर्णपणे रमून गेले, त्यांना दुसरे काही सुचले नाही, सर्व स्तब्ध होऊन ऐकत राहिले जसे की प्रसिद्ध गायक किंवा कलाकारांच्या सुमधुर गायनाने रसिक भारावून जातात, किंवा एखाद्या खास संगीताने श्रोत्यांना मोहून टाकतात, मग ते शास्त्रीय संगीत असो, भक्तिगीत असो किंवा लोकगीत असो. या विद्यार्थिनींनी गाण्याने सर्वांची मने जिंकली.




# कच्च्या कानाचा राजा

ज्योतिर्मय साहित्य

एक राजा होता. अगदी कच्च्या कानाचा. कुणी काही सांगितले की कुठलीही शहानिशा न करता लगेच विश्वास ठेवणार व त्यामुळे त्याचे निर्णय चुकू लागले. व राज्यात अंदाधुंदी निर्माण झाली होती. लोक खोटेपणा करायला लागले होते. जो मनाला येईल तसा वागत होता.असे चालत असताना राजाचा जो सेनापती होता, त्याची एका व्यक्तीशी दुष्मनी झाली होती.

ती व्यक्ती खूप प्रामाणिक व चांगली होती पण सेनापतीच्या अरेरावीला कंटाळून त्याच्या दादागिरीला आव्हान देत होती. तेंव्हा सेनापतीने त्याला मारायची एक योजना आखली. त्याने आपल्या राजाला सांगितले, राजाजी आपल्या राज्यात एक अशी नकारात्मक व्यक्ती आहे की त्याचा चेहरा सकाळी सकाळी बघितला की बघणारा तो व्यक्ती त्यादिवशी उपाशीच राहतो. त्याला जेवायलाच मिळत नाही. मात्र आपल्यावर सारखे कच्च्या कानाचा म्हणून आरोप होत असल्याने राजाने यावेळी सेनापतीच्या बोलण्याची शहानिशा करायचे ठरवले.



त्याने सेनापती द्वारे त्या व्यक्तीला आपल्याकडे बोलावून घेतले व आपल्या महालात आपण मोठ्या सुसज्ज पलंगावर झोपला व त्या व्यक्तीला शेजारी खाली झोपायला सागितले, जेणेकरून सकाळी उठल्या बरोबर त्याचा चेहरा दिसेल. आणि तसेच घडले. राजाने त्याचा सकाळी सकाळी चेहरा बघितला मात्र त्या दिवशी दिवस भरदरबारात अनेक अडचणी आणि प्रश्न उत्तरे चालली व राजाला संध्याकाळ पर्यंत जेवायला मिळाले नाही. संध्याकाळी ताजं जेवणार तर एक उंदीर स्वयंपाक घरात अन्न असलेल्या प्रत्येक पदार्थावरून पळाला व शेवटी वरणात जाऊन पडला.




आता मात्र राजा फार चिडला त्याने सेनापतीला बोलावून, ज्या व्यक्तीचे सकाळी तोंड पाहिले होते त्याला फाशी देण्याचे फर्मान सोडले. त्या व्यक्तीला फाशीसाठी आणण्यात आले तेंव्हा राजा त्याला म्हणाला, सकाळी सकाळी तुझे तोंड जरी कुणी पाहिले तर तो माणूस उपाशी राहतो. तुला जिवंत ठेवण्यात काही उपयोग नाही.


बोल तुझी शेवटची ईच्छा काय आहे? तेंव्हा ती व्यक्ती विनम्रपणे म्हणाली, राजाजी खरं तर असं काही नसतं, पण असच कुणाचं सकाळी सकाळी तोंड पाहून पाहणारा व्यक्ती उपाशी राहत असेल तर मग मी आज सकाळी सकाळी तुमचे तोंड पाहिले, आणि मला आता मृत्यू मिळणार आहे. याचा अर्थ तुमचे सकाळी सकाळी तोंड पाहणाऱ्याला मृत्यू मिळतो असे म्हणू का? तसे असेल तर आधी तुम्हाला फाशी व्हावी, ही माझी शेवटची ईच्छा आहे. हे ऐकल्यावर राजाला आपली चूक कळली. राजाने त्या व्यक्तीच्या हुशारीचे कौतुक करुन त्याला बक्षिस म्हणून आपला सल्लागार म्हणून नेमले.

बोध : कुणाच्या चेहरा, तोंड पाहून काही नकारात्मक बोलणे योग्य नाही.

# बालं बाल वाचलो...

ज्योतिर्मय साहित्य

मला आठवते तशी ही घटना १९८८ सालची आहे. भाद्रपद महिना होता, गौरी गणपतीचे दिवस होते. मी माझ्या नोकरी निमित्त हिंगोली येथे राहत होतो.माझे आई वडील भोकरदन येथे राहत होते. महालक्ष्मी पुजनानिमित्त आम्ही सर्व भावंड तेथे एकत्र जमत असू.माझी पत्नी व मुली या निमित्त गावाकडे रवाना झाल्या होत्या. मला रजा नसल्यामुळे मी एक दिवस आधी निघालो. नेहमीच्या हिंगोली-औरंगाबाद बसने दुपारी चार वाजता निघालो. त्या दिवशी बस मध्ये आमचे प्राचार्य मंत्री सर ही होते. पावसाळी वातावरण होते. जातांना मध्यम स्वरुपाचा पाऊस सुरु झाला. आमची बस मंठा ते जालना या दरम्यान असतांना पावसाचा जोर वाढला व अचानक पावसाने उग्र रुप धारण केले. धो-धो पाऊस सुरू झाला. बस डामरी या गावाजवळ आली. पुढे एक ओढा होता व त्यावर पुल ही होता, परंतु त्याची उंची फारच कमी होती. आमची बस त्या पुलावरुन जाणार तितक्याच ओढ्याला मोठा पुर आला, बस चालकाच्या लक्षात आल्याने त्याने तातडीने ब्रेक लावला व बस मागे घेतली. क्षणाचाही विलंब झाला असता तर कदाचित आमची बस वेगाने येणा-या पाण्याच्या प्रवाहात वाहुन गेली असती व होत्याचे नव्हते झाले असते.


प्रा.प्रमोद दसरे,
पुणे. मो.नं. 9850183909

नशीबाने व बस चालकाच्या प्रसंगावधानाने आम्ही सर्वजण बालं बाल वाचलो. बस मागे वळवून एका स्थानकावर थांबविण्यात आली. तेथे एका हॉटेल मध्ये खिचडी खाल्ली व पुराचे पाणी केंव्हा कमी होते याची प्रतिक्षा करु लागलो. साधारणपणे रात्री एक वाजता पुर ओसरू लागला. बस चालकाने खात्री केल्यानंतर बस निघाली व आम्ही रात्री दोन वाजता जालना येथे पोहोचलो. तेंव्हा सर्व प्रवाशांचा जीव भांड्यात पडला.

मी घरी गेल्यावर सर्व हकीकत सांगितली.ते ऐकून घरातील मंडळी स्तब्ध झाली. आई वडील म्हणाले की दैव बलवत्तर म्हणून व श्री महालक्ष्मीच्या कृपेने तुमचा पुनर्जन्म झाला असे समजा. देवाचे आभार माना.या एका घटनेवरून किंवा मी ज्या काही घटनापाहिल्या अथवा ऐकल्या त्यावरून मला असे जाणवले की जे काही घडतं ते नशीबानेच घडतं.

# काही तरी राहून गेले !

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार सर्वांना,


आजच्या लेखन विषयाबद्दल मी विचार करू लागलो तेंव्हा माझ्या लक्षात आली की -

''काही तरी राहून गेले '' हे स्वतःला जाणवण्यासाठी अगोदर , मागे वळून पहावे लागेल, मनाशी किती नि काय काय करायचे ठरवले होते ? त्यातील किती पूर्ण करता आले, किती अर्धवट राहिले, जे अजूनही पूर्ण करता येऊ शकते'' अशी यादी मनात आठवावी लागेल,

त्याशिवाय ते नेमके काय आहे '' ज्यातले काही तरी राहून गेले '' हे ठरवता येणार नाही .

यात अजून एक गम्मत आहे मित्र हो, ती म्हणजे

''काही तरी राहून गेले'' ही संकल्पना, संज्ञा किंवा ही टर्म समजण्यास अवघड आहे '' ह्यात अनेक अर्थ आहेत- ते कसे आहेत , ते सांगतो तुम्हाला-


*अरुण वि.देशपांडे-पुणे*
*9850177342*

१. स्वतःसाठी करण्याचे राहून गेले असे काही..

२. इतरांसाठी करण्याचे राहून गेले असे काही..

अशा स्वरूपाच्या अनेक गोष्टी असतात की ज्या न केल्यामुळे मनात खंत असते, एक बोच असते, जी मनाला टोचणी देते ''काही तरी राहून गेल्याची.

३. काही भावनिक देणी-घेणी, व्यावहारीक देणी-घेणी'' यांचे हिशेब करणे कधी कधी राहून जाते ते नेहमीसाठीच.

यातून एकतर्फी अपेक्षाभंग होतात, अबोल-दुरावे असे काही निर्माण होऊन बसतात, वेळीच इलाज करणे राहून गेले की पुढे आयुष्यभर ''काही तरी राहून गेले'' ही मनाची रुखरुख काही केल्या आपली पाठ सोडत नाही. मित्र हो- अशी बिकट मनोवस्था टाळता येऊ शकते, त्यासाठी जे करायचे ते वेळीच '' केले पाहिजे. अस्वस्थ मन'' स्वस्थता लाभू देत नसते, त्याचा वेळीच बंदोबस्त करण्यात स्वतःचे भले आहे.

# बालवडकर शाळेत सायकल दुरुस्तीचे प्रशिक्षण कार्यशाळा

ज्योतिर्मय साहित्य

**बालेवाडी,पुणे** – शालेय विद्यार्थ्यांना राष्ट्रनिष्ठा, स्वयंशिस्त,ध्येय, वाचन संवर्धन व कौशल्य विकास यांना प्राध्यान्य देऊन सामाजिक कार्य करणार्या श्री.भगवती सेवा आश्रम व जीवन कौशल्ये विकास यांच्या संयुक्तीक विद्यमाने बालेवाडी, पुणे येथील श्री.बाबूराव गेणूजी बालवडकर शाळेत सायकल दुरुस्तीचे प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली.बाणेर येथिल परिहार सायकल मार्ट मार्फत तंत्रज्ञ श्री.नरेश बोराडे याच्या मदतीने आयोजित करण्यात आली होती. त्यात रुद्र भालेराव व गणेश मिरगे व अनेक शालेय विद्यार्थी सहभागी होते.

उपक्रम संकल्पक श्री.गिरीधर राठी, डॉ.श्याम कुलकर्णी, प्रकाशदादा बोकील, सुपर्णा सरदेसाई व शाळेच्या मूख्याद्यापिका कल्पना बाबर, शोभा



घोरपडे, उज्वल पवार यांनी सहभाग केला.

# वाघेरे महाविद्यालयात क्रीडा स्पर्धेचे आयोजन




ज्योतिर्मय साहित्य

**सासवड** – वाघीरे महाविद्यालयामध्ये क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धा दि २९ व ३० डिसेंबर रोजी सासवड येथील वाघीरे महाविद्यालयाच्या मैदानावर जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. असे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव ॲड संदीप कदम, यांनी माहिती दिली.

सासवड (ता पुरंदर) येथील वाघिरे महाविद्यालयाच्या सभागृहात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी मानद सचिव ॲड संदीप कदम, बोलत होते ते पुढे म्हणाले या स्पर्धांमध्ये वैयक्तिक व सांघिक खेळ मध्ये प्रामुख्याने बुद्धिबळ, योगासने, कुस्ती, कराटेतायक्कांदो, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल आणि ॲथलेटिक्स या क्रीडाप्रकारांचा समावेश असून ३,९११ खेळाडू थेट जिल्हास्तरीय फेरीत सहभागी होणार आहेत. तत्पूर्वी, गटस्तरीय फ ेऱ्यांमध्ये १५,००० खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. सांघिक स्पर्धेत प्रथम आणि वैयक्तिक प्रकारात प्रथम दोन क्रमांक मिळविणारे खेळाडू जिल्हा स्तरावर पात्र ठरतील, अशी स्पर्धे ची रचना निश्चित करण्यात आली आहे.

या स्पर्धांचे उद्घाटन सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ०८.३० वा. खासदार सुनेत्राताई पवार आणि प्रवरा मेडिकल संस्थेचे कुलगुरू डॉ. राजेंद्र विखे पाटील यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

उद्घाटन सोहळ्यास राजकीय, सामाजिक, क्रीडा व कला क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार असून हा सोहळा ग्रामीण क्रिडा संस्कृतीचा उत्सव ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली, उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव ॲड संदीप कदम, खजिनदार ॲड मोहनराव देशमुख, उपसचिव एल.एम. पवार, सहसचिव ए.एम. जाधव, प्राचार्य, क्रिडा शिक्षक आणि सर्व शाखाप्रमुखांच्या अथक नियोजन व परिश्रमातून या स्पर्धा साकार होत आहेत.

या स्पर्धा केवळ जिंकण्यासाठी नसून ग्रामीण मातीतून भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून आयोजित केल्या आहेत, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. ''या क्रीडा उपक्रमांतून पुरंदरच्या मातीतून जागतिक स्तरावरील खेळाडू घडतील,'' असा दृढ आशावाद त्यांनी बोलून दाखवला.

संस्थेच्या या शैक्षणिक व क्रीडा वाटचालीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य विकास आणि क्रीडा संधींचे त्रिवेणी संगम असलेले व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. येणाऱ्या काळातही ही स्पर्धा अधिक व्यापक, गतिमान होत राहील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# बांगलादेशच्या निवडणुकीवर अस्थिरतेचे सावट

ज्योतिर्मय साहित्य

पाकिस्तानने केलेल्या शोषणाला कंटाळून १९७१ साली बांगलादेश मुक्त झाला. शेख मुजिबूर रहमान यांचे वर्णन वंग बंधू असे केले जाते, त्यांनी अमार सोमवार बांगला हे महाकवी रवींद्रनाथ टागोर यांचे गीत बांगलादेशचे राष्ट्रगीत म्हणून घोषित केले होते. बांगलादेशच्या जन्माची कथा ही शोषणाविरुद्धच्या रोमांचक इतिहासाची कथा बनली होती बांगलादेश मुक्त झाला तेव्हा शेख मुजावर रेहमान यांनी केलेल्या भाषणात असे म्हटले होते की अमादे इतिहास संघर्ष माअचेन म्हणजे आमचा इतिहास हा संघर्षाने भरलेला आहे. बांगलादेशच्या नशिबी हा अस्तित्वाचा संघर्ष आजही कायम आहे शेख मुजिबूर रहमान यांच्या कन्या शेख हसीना या तब्बल तीन वेळा बांगलादेशच्या पंतप्रधान बनल्या होत्या, त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील कुटुंबीयांना दिलेल्या आरक्षणावरून तेथील तरुणांनी आंदोलन केले त्यावेळी हिंसाचार झाला. त्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आणि अखेर त्यांना पद सोडून भारताकडे आश्रय घ्यावा लागला त्यानंतर ची कथा ही दुर्दैवाची कथा आहे.

असफल मोहम्मद युनुस

बांगलादेशातील प्रतिक्रांती ही अमेरिका आणि चीन यांनी फुस लावल्यामुळे झाली. त्यात पाकिस्तानने तेल ओतले, भारत विरोधी भावना भडकविण्याचा प्रयत्न करण्यात आला. शेख हसीना यांनी पदत्याग केल्यानंतर मोहम्मद युनूस यांचे अंतरिम सरकार सत्तेवर आले. या सरकारला एक वर्षे पाच महिने झाले परंतु नोबेल पुरस्कार विजेत्या युनोसियांना अर्थकारण सांभाळता आले ना प्रशासनाची घडी बसविता आली त्यांच्यावर मुख्य जबाबदारी होती निवडणुकापूर्वी बांगलादेशात योग्य लोकशाही वातावरण निर्माण करणे परंतु सव्वा वर्षे झाले अद्यापही युनूस सरकार लोकशाही पूरक वातावरण तयार करू शकले नाही ही दुर्दैवी शोकांतिका आहे.

अल्पसंख्यांक हिंदू ख्रिश्चन जैन तसेच या मुस्लिम यांच्यावरचे हल्ले सतत वाढत आहेत, चितगावचे संत बेकायदा तुरुंगात डांबण्यात आले त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला चालविण्यात आला त्यानंतर अलीकडे दिपू या तरुणास झाडाला बांधून जाळण्यात आले वर्षभरात १००० पेक्षा अधिक हिंदू मंदिरांची मोडतोड करण्यात



आली तेव्हा आवामी लिगच्या कार्यकर्त्यांची घरे जाळण्यात आली खुद्द संयुक्त राष्ट्र संघाने अल्पसंख्यांकांच्या रक्षणाची हमी सरकारने घ्यावी अशी ठाम भूमिका घेतली असतानाही युनो सरकार मूग गिळून बसले. डॉक्टर मोहम्मद युनोस जेवढे लांब भाषणे करतात पण त्यांच्या बोलात बोल नसतो त्यांचे प्रशासकीय अपयश स्पष्टपणे दिसत आहे, पण तरीही ते स्वतःच्या तंत्राने नव्हे तर परदेशी धोरणाच्या सल्ल्याने चालतात. त्यांचा बोलविता धनी वेगळाच आहे त्यांना कसे आवरावयाचे हा खरा प्रश्न आहे ज्या विद्यार्थी संघटनांनी त्यांना सत्तेवर बसविले त्यांच्या जीवाची रक्षा करण्यात सुद्धा हे सरकार साफ अपयशी ठरले आहे.




युवा नेत्याची हत्या

बांगलादेशचे राजकारण कमालीचे अस्थिर झाले आहे, धार्मिक अत्याचार, दंगली, हिंसाचार आणि अल्पसंख्यांकावर होणारे हल्ले रोखण्यात युनो सरकार अपयशी ठरले पण त्याहीपेक्षा दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्यांना ज्या युवा संघटनांनी सत्तेवर बसविले त्यांची रक्षा करण्यात सुद्धा सरकार अपयशी ठरले. हसीना यांच्या विरोधातील बंडाचे नेतृत्व करणारा युवा नेता शरीफ उस्मान हादी याची हत्या झाल्यानंतर उपचार चालू असताना त्यांचा सिंगापूर येथे मृत्यू झाला. त्यानंतर बांगलादेशात हिंसाचार उसळला. दिपू चंद्र दास या अल्पसंख्याक हिंदू युवकाला झाडाला बांधून जाळण्यात आले. त्याचेही पडसाद देशभर उमटले. या क्रिया प्रतिक्रियांमुळे बांगलादेशात देशभर हिंसेचे लोन पसरले आहे आणि दोन्ही गटांना रोखण्यात मोहम्मद युनूस सरकारचे अपयश ही गोष्ट चिंता वाढवणारी ठरली आहे.

तीन पक्षातील चुरस

१२ फेब्रुवारीला होणाऱ्या बांगलादेश संसदेच्या निवडणुकीत तीन पक्षांमध्ये विशेष चुरस आहे, खालिदा जिया( बी एन पी) यांचा बांगलादेश राष्ट्रवादी पक्ष तसेच मूलतत्त्ववादी जमाती इस्लामी हा पक्ष आणि युवा आंदोलकांचा राष्ट्रीय नागरिक पक्ष एनसीपी या तीन पक्षात कमालीची चुरस आहे. बीएनपी नेत्या खालिदा जिया या ढाका येथे दवाखान्यात अखेरचे दिवस मोजत आहेत. त्यांचा मुलगा तारीक हा इंग्लंड मध्ये असून तो डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात नाट्यमयपणे बांगलादेशात परतणार आहे. आईप्रमाणे त्याची जनमतावर किती पकड आहे हा खरा प्रश्न आहे, छात्र नेत्याच्या हत्येमुळे एनसीपी म्हणजे राष्ट्रीय नागरिक पक्ष हतबल झाला आहे, अवामी लीगला आधीच निवडणुकीतून हद्दपार करण्यात आले आहे. त्यामुळे खरी लढत मूलतत्तवादी जमाती इस्लामी बांगलादेश राष्ट्रवादी पक्ष आणि विद्यार्थ्यांचा राष्ट्रीय नागरिक पक्ष या तीन पक्षाचा होणार आहे एका पक्षाला बहुमत न मिळाले तर यापैकी बी एन पी आणि एनसीपी यांची आघाडी सत्तेमध्ये येऊ शकते, किंवा एनसीपी विद्यार्थी संघटनेला अधिक जागा मिळाले तर त्याला बीएनपीला पाठिंबा द्यावा लागेल. महिनाभराच्या काळात प्रचाराची रणधुमाळी थांबल्यानंतर कोणता पक्ष जनमताची पकड घेतो हे लक्षात घेण्यासारखे आहे. तसेच जुलै जाहीरनाम्यावर म्हणजे घटनात्मक सुधारणेवर जनमत प्रदर्शन होणार आहे लोकांनी जर या सुधारणांना पाठिंबा दिला तर घटनादुरुस्ती होऊन त्या सुधारणा अमलात येतील यामध्ये प्रामुख्याने निवडलेल्या पंतप्रधानाला दोन टर्म पेक्षा अधिक राहता येणार नाही.

**(क्रमशः)**

**हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)** E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559